# लघुवाद न्यायालय, बांद्रा शाखा

**<u>दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दुपारी १.३० वाजता लघुवाद न्यायालय, बांद्रा शाखा येथील नियोजित क्षेत्रफळाची साफसफाई बाहययंत्रणेद्वारा कंत्राटी पध्दतीने करण्याकरिता आयोजित करण्यात आलेल्या निविदापुर्व बैठकीचे इतिवृत्त</u>**

| | | |
|---|---|---|
| बैठकीचा दिनांक व वेळ | : | दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दुपारी १.३० वाजता |
| बैठकीचे स्थळ | : | न्यायालय क्र. ३९. |
| बैठकीस उपस्थित समिती सभासद | : | श्री. पी. बी. ठाकरे, अतिरिक्त मुख्य न्यायाधीश, अध्यक्ष<br>श्री. एस. जी. बोर्लेपवार, न्यायाधीश, सभासद<br>श्री. एम. एम. शेख, न्यायाधीश, सभासद |
| बैठकीस उपस्थित अधिकारी व कर्मचारी | : | श्रीमती एस. के. कावरे, अप्पर प्रबंधक, श्रीमती एन. वाय. शाहीर, अप्पर प्रबंधक, श्री. एस. झेड. राणे, न्यायालय व्यवस्थापक, श्री. आर. एन. दावनपेल्ली, लिपिक—टंकलेखक, श्री. एम. ए. भाबल, लिपिक—टंकलेखक, श्री. सत्यजित गंगावणे, लिपिक—टंकलेखक |
| बैठकीस उपस्थित व निविदा प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणारे सेवापुरवठादार | : | सात कंत्राटदार |

बैठकीमध्ये कंत्राटदारानी उपस्थित केलेले प्रश्न व त्याचे निरसन:

**१. एनएसआयसीने जारी केलेल्या प्रमाणपत्रानुसार बयाणा रक्कम भरण्यापासून सूट दिलेली असेल तर ती या निविदा प्रक्रियेसाठी लागू राहील का ?**

**निरसन:** संबंधित कंत्राटदारास सदर सवलतीचे प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले असता, बैठकीमध्ये सदर प्रमाणपत्र आता उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले. सबब, सदर शंकेचे निरसन करताना असे सांगण्यात आले की, सदर प्रमाणपत्र शासनाने जारी केलेले असेल व

त्यामध्ये बयाणा रक्कम भरण्यासाठी सूट दिल्याचे प्रमाणित केलेले असल्यास सदर प्रमाणपत्र या निविदा प्रक्रियेसाठी ग्राहय धरण्यात येईल.

**२. निविदा सादर करताना पुरविण्यात येणा—या सफाई कामगारांच्या संख्येनुसार आर्थिक निविदा सादर करावयाची आहे का ?**

**निरसन:** शासन निर्देशानुसार निविदा प्रक्रिया ही सफाई कामगारांच्या संख्येनुसार राबविण्यात येत नसून क्षेत्रफळानुसार राबविण्यात येत आहे. त्यानुसार निविदेमध्ये नमूद केलेल्या नियोजित क्षेत्रफळ व प्रसाधनगृहांची सर्व कंत्राटदारांनी पाहणी करावी व त्याची साफसफाई करण्यासाठी लागणारे मनुष्यबळ, साधनसामग्री, सेवाकर व इतर अन्य सर्व बाबींचा अभ्यास करुन आर्थिक निविदा सादर करण्यात यावी.

**३. कंत्राटी कामगारास किमान वेतन देणे आवश्यक आहे का ?**

**निरसन**: होय. शासन निर्णयानुसार कंत्राटी कामगारास किमान वेतन देणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा स्वीकृत करण्यात येणार नाही.

**४. निविदा स्वीकृतीसाठी आर्थिक निविदेसाठीच्या नमुन्यामधील कोणत्या रकान्यातील रक्कम गृहीत धरण्यात येणार आहे ?**

**निरसन:** कंत्राटदाराने आर्थिक निविदा सादर करताना रकाना क्र. ४ (क्षेत्रफळनिहाय साफसफाई करण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली एकूण वार्षिक रक्कम ), रकाना क्र. ५ साधनसामुग्रीचा वार्षिक खर्च, रकाना क्रं. ६ वार्षिक सेवाकर यांची रकाना क्र. ७ मध्ये नमूद केलेली एकूण रक्कम व त्यानुसार आर्थिक निविदेमध्ये नमूद केलेली निविदेची दोन वर्षासाठीची एकूण रक्कम निविदा स्वीकृतीसाठी गृहीत धरण्यात येईल.

**कार्यालयामार्फत देण्यात आलेली अतिरिक्त आवश्यक माहिती:**

कंत्राटदारांनी तांत्रिक निविदा सादर करताना निविदेमध्ये नमूंद केलेली सर्व कागदपत्रे सादर करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे निविदा अटी व शर्ती अपलोड करताना

त्यावर संबंधित कंत्राटदाराची सही व शिक्का आहे किंवा नाही याची शहानिशा करावी. निविदा सूचनेचा योग्य तो अभ्यास सर्व कंत्राटदारांनी करुन नंतरच निविदा भरावी. कोणतीही तांत्रिक त्रुटी आढळल्यास निविदा रद्द अथवा नाकारली जाईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

इतिवृत्त तयार करणारः श्री. आर. एन. दावनपेल्ली, लिपिक–टंकलेखक, लघुवाद न्यायालय, मुंबई.

बैठकीचे इतिवृत्त पाहिले --

१. मा. श्री. पी. बी. ठाकरे, अप्पर मुख्य न्यायाधीश, समिती अध्यक्ष, लघुवाद न्यायालय, बांद्रा शाखा

२. श्री. एस. जी. बोर्लेपवार, न्यायाधीश, समिती सदस्य, लघुवाद न्यायालय, बांद्रा शाखा

३. श्री. एम. एम. शेख, न्यायाधीश, समिती सदस्य, लघुवाद न्यायालय, बांद्रा शाखा

४. श्री. एस. झेड. राणे, न्यायालय व्यवस्थापक